# ॥ अध्याय सोळावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयगुरवे नमः ॥ ॥ गुरु सांगती प्रिय शिष्याला । वत्सा करूनि एकाग्रचित्ताला । परिसाव्या स्वामीसमर्थलीला । संसारार्णवतारक ॥ १ ॥ मोगलाईप्रांतीं बीड जिल्ह्यांत । वडवाळ-राजूर ग्राम शोभिवंत । मोठें तालुक्याचें आहे प्रख्यात । तेथील वृत्त परिसावें ॥ २ ॥ एक जुना लहानसा मठ । त्या मठांत जाऊनियां नीट । श्रीगुरुस्वामी जगद्वरिष्ठ । बैसले अवीट सप्रेमें ॥ ३ ॥ व्हावा त्या स्थानाचा भाग्योदय । जनांसि समजावें सत्य प्रिय । स्वधर्मकर्म सदाचारमय । वेदशास्त्रविहित अनादि जें ॥ ४ ॥ लोकांत परस्पर प्रेमवृद्धि । सहज व्हावी अंतःकरणशुद्धि । अद्वेषपणें परोपकारबुद्धि । आयासरहित वसावी ॥ ५ ॥ संसारी जन असूनि तयां । पोटीं उपजावी क्षमा दया । येऊनि सुदुर्लभ नृदेहीं या । सत्कीर्ति लौकिक संपादावा ॥ ६ ॥ या जगत्कल्याणहेतूस्तव । राजूरमठांत वास्तव । राहिले योगीश्वर ज्यांचा स्तव । करिती निगमागमादिक ॥ ७ ॥ तेजस्वी मनोहर दिव्यमूर्ती । विलोकूनि सर्वत्र संतोषती । नित्य येऊनि साष्टांगें नमिती । ईश्वरविभूति म्हणती जन ॥ ८ ॥ त्या कालीं लालभारती इत्यादिक । श्रीगुरुस्वामींचे बनले सेवक । वाढला समर्थांचा लौकिक । अवतारिक पुरुष म्हणूनि ॥ ९ ॥ पुढें लोकांनीं करूनि खटपट । प्रसिद्ध चंदुलाल दिवाण धर्मिष्ठ । त्यांना निवेदिलें वृत्त इष्ट । कार्य व्हावया नृपाज्ञें ॥ १० ॥ त्यांनीं निजामसरकारची आज्ञा । घेऊनि विहित प्राज्ञा । लोकांची जाणूनि शुद्ध प्रज्ञा । विचारिली संज्ञा समर्थांची ॥ ११ ॥ राजमुद्रांकित सनदपत्र । स्वामिरायांच्या नामाचें स्वतंत्र । सहस्रमुद्रांचें वर्षासन प्रमाणपत्र । अर्पूनि संस्थान चालविलें ॥ १२ ॥ एके समयीं त्या राजूरची मंडळी । श्रीक्षेत्र

पंढरपुरास गेली । आषाढी एकादशीस विठ्ठलमाउली । दर्शनार्थ सप्रेमें ॥ १३ ॥ भीमेसी आला महापूर । पहावया धांवले लोक समग्र । जिकडे तिकडे उदक विस्तार । शोभायमान् पावलें ॥ १४ ॥ त्या महापुराच्या उदकावरूनि । येतांना अकस्मात् देखिले लोकांनीं । योगाधीश्वर नृसिंहमुनि । दैदीप्यमान् यतिरूपें ॥ १५ ॥ महापुरावरूनि सहजगतीं । चालत आले निर्भयस्थिति । महदाश्चर्य सर्व लोक मानिती । म्हणती पुरुषोत्तम अलौकिक हे ॥ १६ ॥ राजूरच्या मंडळीनें हें देखिलें । यतींद्रतिलकांसि म्हणती भले । समर्थ राजुराहूनि निघाले । केव्हां आले कळेना ॥ १७ ॥ योगमायेचें संपूर्ण भांडार । आपण साक्षात् आहां परमेश्वर । ऐसें वदूनि सकल नारीनर । गेले पांडुरंगदर्शना ॥ १८ ॥ यात्रा आटोपूनि राजूरचें मंडळ । गेले स्वनगरीस भक्तप्रेमळ । प्रथम शोधूनि पुसती घननीळ । स्वामिराज येथें होते कीं ॥ १९ ॥ तेव्हां राजूरचे लोक सांगती । येथेंचि होते यतियूथपति । कोठेंही क्षणमात्र गेले नसती । श्रीगुरुस्वामी समर्थ ॥ २० ॥ मग पंढरीस जाऊन आलेले लोक । ग्रामस्थांसि सांगती कौतुक । हे योगाधीश्वर जगन्नायक । पंढरपुरीं विलोकिले ॥ २१ ॥ आम्ही पंढरीस असतां महापूर । भीमेसी आला अनिवार । चोहोंकडे पसरलें नीर । पहावया जनसमुदाय पातला ॥ २२ ॥ त्या समयाचा देखावा अपूर्व । ईश्वरी मायेचा अगम्य भाव । टकमकां पाहती सर्व जीव । महापूर-नीर वैभव ॥ २३ ॥ ऐशा महापुराच्या उदकावरूनी । सहजगति परतीराहूनी । श्रीगुरु चालत आले नृसिंहमुनि । पादसंवाहनासह अलीकडे ॥ २४ ॥ हें अद्भुत आश्चर्यकारक । सर्वांनीं देखिलें प्रत्यक्ष-प्रमाणपूर्वक । म्हणती तेव्हां लीनत्वें सकळिक । हे अवतारिक ईश्वर ॥ २५ ॥ आम्ही अज्ञानी प्रापंचिक मंदमति । नेणों समर्थ विचित्रगति । पायींच्या वाहनांसही स्पर्शले नसती । बुद्बुदादिक जलाचे ॥ २६ ॥ राजुराहूनि कोठें गेले नसून । महापुरावरूनि निर्भयें चालून । अकस्मात् यतिरूपें जगज्जीवन । पांडुरंग क्षेत्रीं प्रगटले ॥ २७ ॥ श्रीगुरु त्रैमूर्ति नृसिंहमुनि । तीर्थक्षेत्रादिकीं हिंडूनि । जगदुद्धारार्थ विश्रांति-स्थानीं । अक्कलकोटीं

राहिले ॥ २८ ॥ देशोदेशींचे लोक दर्शनासी । येती सहस्त्रावधि अक्कलकोटासी । सद्भावें यतिराज-चरणांसी । आलिंगिती नमूनियां ॥ २९ ॥ अखंडमंडलाकार पारमार्थिक । विस्तार पावली कीर्ति अलौकिक । अगणित निष्कामी सकामनिक । झाले सेवक अनन्य ॥ ३० ॥ स्वामी समर्थ राजुरास असतांना । 'चंचलभारती' या नामाभिधाना । शिष्यांनीं ठेविलें यति-नारायणा । दशविध संन्यासांतील ॥ ३१ ॥ असो राजुराहूनि यतींद्रराय । गेल्यावरी सर्व करिती हाय । प्रारब्ध आमुचें फुटलें काय । ओढवला अंतराय दर्शनार्थ ॥ ३२ ॥ मग बहुत संवत्सर गेल्यावर । राजुरांतील मठाचें उत्पन्न थोर । निजामसरकार आज्ञानुसार । बंद झालें सर्वस्वीं ॥ ३३ ॥ नंतर श्रीसमर्थांचे सेवक । लालभारतीसहित कित्येक । शोधितां तीर्थक्षेत्रीं अनेक । कळलें सम्यक् वृत्त तयां ॥ ३४ ॥ कीं दत्तात्रेय-श्रीगुरुगिरिनारी । जगतासि भरंवसा सर्वदा भारी । ते परमात्मा ध्वजाधारी । प्रज्ञापुरीं वसताति ॥ ३५ ॥ ऐसें समजतांचि लालभारती आदिक । अक्कलकोटासि पातले तात्कालिक । जनांसि पुसती यतिनायक । जगद्गुरु कोठें विराजती ॥ ३६ ॥ विश्वात्मा सद्गुरु कृपासागर । प्रणतवत्सल असे निरंतर । जगदुपकारार्थ विधिहरिहर । धरिती अवतार एकरूपें ॥ ३७ ॥ जो अनादि अनंत अज अव्यय । श्रीगुरुस्वामी दत्तात्रेय । भगवान् योगीश्वर जगत्प्रिय । तो दाखवा हो सत्वरी ॥ ३८ ॥ जो वेदान्तवेद्य सनातन । 'साक्षी चेता केवल निर्गुण' । तो दावा हो जगज्जीवन । आम्हां दीनां शीघ्रत्वें ॥ ३९ ॥ जो वेदविहित सद्धर्माचें बीज । ऋषि योगी भक्तजनांचें निजगुज । सर्वांतर्यामी शाश्वत पुराण अज । तो गुरुमहाराज दावा हो ॥ ४० ॥ दीन भोळ्या भाविकांचा मायबाप । ज्यासाठीं सकल करिती जपतप । नित्योपलब्ध हृदयस्थ ब्रह्मस्वरूप । अस्तिभातिप्रियत्वें ॥ ४१ ॥ जें शुद्ध भक्तीचें संजीवन । कविवर सज्जनांचें विश्रांतिस्थान । एकमेवाद्वितीय ब्रह्म परिपूर्ण । तें कोठें भेटेल सांगा जी ॥ ४२ ॥ समीप नित्य प्राप्त असून । अविद्यामायाभ्रमेंकरून । देहाहंकृतीचें पडून वेष्टण । दुरावलेसें वाटतसे ॥ ४३ ॥ तत्संगें झालिया

निर्विषय चित्त । शुद्ध निर्मल वैराग्ययुक्त । श्रीसद्गुरुवरें वेदान्त-प्रतिपादित । भेटे हृदयांत अभेदत्वें ॥ ४४ ॥ ते परमात्मा स्वामीसमर्थ । जे राजुरांत होते जगदुद्धारार्थ । भेटवा हो आम्हांसी त्वरित । अक्कलकोटस्थ जन हो ॥ ४५ ॥ ऐसें बोलून लालभारतीसह । धरूनि अंतरीं दर्शनाग्रह । शरण निघाले सेवक अपरिग्रह । आले बुधवारपेठेंत ॥ ४६ ॥ त्या कालीं लीलाधारी नृसिंहमुनि । प्रियभक्त चोळाप्पाचे सदनीं । बैसले होते सुखें सिंहासनीं । दयासिंधु जगद्गुरु ॥ ४७ ॥ दिव्य तेजस्वी मनोहर मूर्ति । पाहूनि ओळखिले शुद्धमति । साष्टांग दंडवत घालिती । लालभारती इत्यादिक ॥ ४८ ॥ तेव्हां कंठ झाला सद्गदित । नेत्रीं वाहती प्रेमाश्रुपात । अंगीं रोमांच दाटले पुलकित । देहभानरहित ऐसे ॥ ४९ ॥ ओसरूनि कल्पनेचा बाजार । शब्दरहित आनंदाचा पूर । दाटला भेटला निर्विकार । गुरु साक्षात्परब्रह्म ॥ ५० ॥ याप्रकारें एक मुहूर्तपर्यंत । लालभारतीस तटस्थ-लक्षणायुक्त । विलोकूनि श्रीमद्दत्तावधूत । स्वामिराज आज्ञापिती ॥ ५१ ॥ स्वरूपलक्षणा सहजस्थिति । निर्विकारी ब्रह्मात्मापरोक्षानुभूति । असंदेह अभेद निश्चितीं । असावी त्रिपुटी टाकूनि ॥ ५२ ॥ ध्याता-ध्यान-ध्येय, ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय । आणि द्रष्टा-दर्शन-दृश्य । इत्यादि सर्व त्रिपुटींचा लय । अवश्य झाला पाहिजे ॥ ५३ ॥ श्रीगुरुमुखें आत्मप्रबोध । श्रवण करूनियां अगाध । लालभारती होऊनि सावध । म्हणे अपराध क्षमा व्हावे ॥५४॥ राजूरग्रामाचे मठाधिपति । आपण मुख्य महंत यथास्थिति । आम्ही आपले सेवक निश्चितीं । बहुत दिवसांचे आहोंत ॥ ५५ ॥ आपला शोध नव्हता बहुत दिन । म्हणूनि आपल्या नांवाचें उत्पन्न । निजाम सरकारांच्या आज्ञेवरून । बंद झालें गुरुवर्या ॥ ५६ ॥ आपल्या हयातीपत्रावरून । आम्हां शिष्यांसि मिळेल उत्पन्न । म्हणूनि सनदा कागदपत्र पुढें ठेवून । केलें नमन साष्टांगीं ॥ ५७ ॥ स्वामी समर्थ म्हणती शिष्यांला । "कोणी गुरु नसे आणि चेला । 'अहंब्रह्मात्मा' सनातन संपूर्ण एकला । व्यापला अंतर्बाह्यवर्ती ॥ ५८ ॥ एक नाथाचा सर्वही पसारा । त्या जगत्पसाऱ्याहूनि नाथ तो न्यारा । लालभारती जाणूनि परमार्थविचारा ।

नको बावरा होऊं रे ॥ ५९ ॥ गुरुशिष्यपणाची अहंकृति । सांडूनि सकल मठमहंती । निरुपाधिक होऊनि ब्रह्मस्थिति । भोगावी अखंड अभेद ॥ ६० ॥ तुम्हांस पाहिजे असेल तर । घ्यावें उत्पन्न मठाधिकार । वर्तावें सदाचारयुक्त निरंतर । षड्विकार त्यागूनि ॥ ६१ ॥ अतिथि-अभ्यागतादिकांसी । यथाशक्ति अर्पावें अन्नोदकासी । नित्य झटावें सर्वभूतांच्या हितासि । सदा नम्र होऊनि ॥ ६२ ॥ कोणत्याही व्यसनांत कधीं न गुंतावे । तीव्रवैराग्यें मना जिंकावें । सदा सर्वदा ब्रह्माभ्यासें चिंतावें । सच्चिदानंदात्मस्वरूप ॥ ६३ ॥ पाहुण्या राउळ्यासारखे अलिप्त । राहून चालावें यथास्थित । मठसंस्थानाधिकार विहित । अनादि वेदोक्तमार्गानें ॥ ६४ ॥ वेदप्रणीतधर्म संप्रदाय । वैदिक अथवा लौकिकादि यथान्याय । परंपरेनें आचरूनि अक्षय । दावावें वळण जनांसी" ॥ ६५ ॥ श्रीगुरुवचन कल्याणकारक । सर्वकालीं सत्यानंददायक । दुस्तरभवसागरतारक । निश्चयात्मक परिसूनि ॥ ६६ ॥ लालभारती कर जोडूनि उभा । प्रार्थी अहो स्वयंप्रकाश स्वयंभा । विश्वसदन कारणरूपस्तंभा । त्रिभुवनारंभक नारायणा ॥ ६७ ॥ विश्वोद्भवस्थितिप्रलयासि हेतु । आपण आहां विश्वपटीं एकचि तंतु । अनंतब्रह्मांडनायका मम हेतु । पूर्ण करा जी बालकाचा ॥ ६८ ॥ ऐसें बोलूनि साष्टांग दंडवत । घालूनि श्रीगुरुनामें गर्जत । गेला सत्वरें नृपभुवनांत । निर्मल गुरुभक्त भारती ॥ ६९ ॥ त्या कालीं श्रीमंत मालोजी महाराज । सत्यन्यायधर्म रीतीनें कामकाज । विलोकित होते निःपक्ष सहज । भोसले उपनामक भूपति ॥ ७० ॥ प्रणाम करूनि नृपवर्यातें । सनदा कागदपत्र जें प्रमाण होतें । नृपसिंहासनापुढें ठेविलें तें । मधुर भाषणें करूनि ॥ ७१ ॥ सारासारविवेकी नृपवर । वाचूनि पाहिलें कागदपत्र । म्हणे श्रीदत्तात्रेयस्वामींचें चरित्र । आहे अगम्य अपार ॥ ७२ ॥ नृपवर्याचे आज्ञेवरूनि । कारभारी आणि इतर अधिकारी जनीं । भक्त चोळाप्पास पाचारूनि । आणिले राजसभेंत ॥ ७३ ॥ एक विचारें सर्वत्रांनीं । समर्थांचें हयातीपत्र दिधलें लिहूनि । लालभारती तें प्रमाणपत्र घेऊनि । योगीश्वरासमीप पातला

॥ ७४ ॥ दत्तात्रेयस्वामीचें पूजन । विध्युक्त करून नैवेद्यसमर्पण । लालभारती समार्थाज्ञा घेऊन । हैद्राबादेस पोहोंचले ॥ ७५ ॥ प्रयत्नें उत्पन्न मिळालें पुनरपि । स्वामीराजचरणकृपें सुखरूपी । थोडेंबहुत चालतसे अद्यापि । लोक सांगती राजूरचे ॥ ७६ ॥ अक्कलकोटांतील समस्तांला । तैसेंचि तेव्हां दर्शनास आलेल्यांला । अत्यंत निःस्पृहत्वाच्या यतिलीला । परमाद्भुत वाटल्या ॥ ७७ ॥ अक्कलकोटभूपतीचे उपाध्याय । वेदशास्त्रसंपन्न राजमान्य । गिरराव सद्धर्मनिरतक्षय । त्यांचे तनय रामकृष्ण ॥ ७८ ॥ ते रामकृष्ण नामक उपाध्याय । ऋग्वेदी ब्राह्मणकुळीं पुण्यमय । संपन्नविद्या आणि विनय । सर्वभूतहितीं रत होते ॥ ७९ ॥ दयाळु स्वभाव परोपकारी । शुद्धचित्त परमार्थविचारी । प्रेमळभाषणी निरहंकारी । सदाचारप्रवर्तक ॥ ८० ॥ रामकृष्णासि बंधु दोन । पंढरीनाथ आणि गोपाळकृष्ण । तेही सद्धर्माचारसंपन्न । असती कुशल व्यवहारीं ॥ ८१ ॥ त्यांच्या मातुश्रीचा वृद्धपिता । भाऊ शेषाद्रि नामें तत्त्वतां । त्या भाऊंसि अत्यंत जरावस्था । प्राप्त झाली अनिवार ॥ ८२ ॥ जरा वाढली दिवसेंदिवस । भाऊंचा प्राण होतसे कासावीस । कंठावरोध झाला श्वास । काळजी सर्वांस पडली तदा ॥ ८३ ॥ त्या कालीं भक्तकामकल्पद्रुम । श्रीमत्परमहंस पुरुषपरम । स्वामी समर्थ परब्रह्म परंधाम । आत्माराम करुणार्णव ॥ ८४ ॥ भाऊ शेषाद्रीच्या सदनीं । अहोरात्र बैसले येऊनी । आपुल्या हस्तीं माळ घेऊनी । वरचेवर फेंकिती ॥ ८५ ॥ घ्यावी फेंकावी पुनःपुनः माला । ऐसा क्रम वारंवार चालला । तों अकस्मात् चमत्कार घडला । तुटली माळा त्या कालीं ॥ ८६ ॥ माळा तुटल्या बरोबर । भाऊंनीं त्यागिलें कलेवर । सर्वांसि तेव्हां वाटला चमत्कार । म्हणती परमेश्वर प्रत्यक्ष हे ॥ ८७ ॥ भाऊ शेषाद्रि महत्पुण्यवान् । श्रीमद्योगिराज अत्रिनंदन । तच्चरणारविंदीं सावधपणें प्राण । अर्पिले भाऊंनीं अंतःसमयीं ॥ ८८ ॥ समीप असूनि भक्तवत्सल । अहो भाग्यें साधला अंतकाळ । भाऊंचें भोळें अंतःकरण निर्मळ । म्हणून कृपाळु

धांवले ॥ ८९ ॥ जन्मभरी करिती अनुष्ठान । जप तप योग याग हवन दान । तथापि अंतकाळीं भगवद्दर्शन । महादुर्लभ असे कीं ॥ ९० ॥ पूर्वीचे जुने मनुष्य साहजिक । पवित्र चित्ताचे भोळे भाविक । म्हणूनि तयावरी जगन्नायक । तात्काल कृपा करी कीं ॥ ९१ ॥ हें चक्षुर्वैसत्य प्रमाण । लाधलें भाऊंसि पदनिर्वाण । हें अवश्य सर्वांनीं लक्ष्यांत ठेवून । नित्य वर्तावें सुगतिप्रद ॥ ९२ ॥ असो भाऊंचें शव स्मशानापर्यंत । पोहोंचवून मग गेले अवधूत । भक्तजनप्रणतवत्सल भगवंत । ज्यांची अपरिमित लीला असे ॥ ९३ ॥ रामकृष्ण राजोपाध्याय । त्यांचे पुत्र पौत्रादिक सविद्याविनय । असती बंधूंचेही तनय । अक्कलकोटीं सुखरूप ॥ ९४ ॥ पूर्वीचे अक्कलकोटांतील । मालोजी महाराजांचे प्रेमळ । दाजी पिराजी भोंसले कुशल । होते मुंबापुरीस ॥ ९५ ॥ त्या दाजीबा भोसल्यासि फार । स्वामिराज दर्शनाची लागली हुरहुर । म्हणे मी श्रीचरणांपासूनि दूर । परदेशीं पडलों दुर्भाग्यें ॥ ९६ ॥ श्रीमद्दत्तात्रेय—स्वामींचे पाय । दृष्टीस पडतील तो सुदिन भाग्योदय । गुरुदर्शनासि अंतराय । पावलों पूर्वदुष्कृतें ॥ ९७ ॥ अंतरीं लागली तळमळ । म्हणे केव्हां भेटतील समर्थ कृपाळ । प्रारब्ध ग्रहदशा माझी दुर्बळ । चरणकमलें दुरावलीं ॥ ९८ ॥ अन्नोदक न लागे गोड । निद्रा—स्वप्नांतही दर्शनाची आवड । लागली निजध्यासाची खोड । विषय द्वाड त्यागुनी ॥ ९९ ॥ दाजीबांच्या मित्र आणि भृत्यांतें । हें अंतर्गुह्य विदित होतें । एके दिवशीं प्रातः शौचमुखमार्जनातें । करूनि दाजीबा गेले स्नानासी ॥ १०० ॥ देवघरांत देवपूजेचें साहित्य । सिद्ध करूनि उभा ठाकला भृत्य । इतुक्यांत अकस्मात् घडलें कृत्य । भक्तप्रीत्यर्थ प्रभूचें ॥ १ ॥ श्रीमद्दत्तात्रेयस्वामी सुराध्यक्ष । देवाचे पाटावरी येऊनि प्रत्यक्ष । स्थित झालेले सर्वसमक्ष । लक्ष्यपूर्वक विलोकिती ॥ २ ॥ अक्कलकोटींचा जुना सेवक । त्यानें ओळखूनि यतींद्रतिलक । दाजीबास पाचारिलें तात्कालिक । स्वामिराजदर्शना ॥ ३ ॥ दाजीबा भोसले धाई धाई । स्नान करूनि आले त्या ठायीं । पाहूनि घालिती दंडवत पायीं । श्रीगुरुस्वामी-

समर्थांच्या ॥ ४ ॥ अनन्यभावें करिती प्रार्थना । मज पातक्यासी करुणाघना । अपराध न गणूनि जनार्दना । दिधलें दर्शन दासासी ॥ ५ ॥ 'पतितपावन' नाम आपुलें । ब्रीद समर्थां सत्यत्वें सांभाळिलें । दर्शन देऊनि सुफलित केलें । माझें पूर्ण मनोरथ ॥ ६ ॥ बहुत जन्मांचीं फळलीं सुकृतें । म्हणूनि कृपासागर श्रीभगवंतें । हितकर दर्शन देऊनि मूढातें । जड पामरातें उद्धरिलें ॥ ७ ॥ स्वामिराय म्हणती अरे भक्तभूषणा । दाजीबा मोल नाहीं तुझ्या गुणां । टाकूनि सर्वथा देहाहंपणा । शरणागत झालासि ॥ ८ ॥ अद्वितीय ब्रह्मानंदस्वरूप मोक्ष । प्राप्त होईल निःशंक नित्य प्रत्यक्ष । सर्वांभूतीं नम्र सदा निरपेक्ष । शांतचित्त असावें ॥ ९ ॥ दाजीबा श्रीफलादिक अर्पितां । अंतर्धान पावले क्षण न लागतां । सर्वांसि आश्चर्य वाटलें तत्त्वतां । स्वामिराज लीला निरखूनि ॥ ११० ॥ संकटसमयीं वारंवार । दाजीबास देती अभयवर । त्यायोगें समाधान निरंतर । राहतसे धीर संतोष ॥ ११ ॥ त्या चतुर दाजीबा भोसल्यास । स्वामिराज लीला-सुधारस । श्रवणद्वारें प्राशूनि उल्हास । अत्यंत वाटे मुहुर्मुहुः ॥ १२ ॥ स्वामीसमर्थ चरणीं खास । दाजीबाचा होता संपूर्ण विश्वास । ऐकतां सांगतां यतीश्वराचा इतिहास । प्रेमाश्रुपात वाहे तदा ॥ १३ ॥ एकेक प्रहरपर्यंत । कंठ व्हावा सद्गदित । अष्ट भावांचा उदय होत । समर्थलीला-श्रवणानें ॥ १४ ॥ शुद्ध भक्तिरूप घेऊनि जीवन । निर्विषय वैराग्य तरूवरी सिंचन । नित्य नियमें वर्धमान । वैराग्यवृक्ष प्रबल झाला ॥ १५ ॥ श्रीसद्गुरूच्या पायगुणें सफल । विरागवृक्ष प्रफुल्लित दृढ विशाल । विस्तारल्यानें प्रपंचजाल । तुटूं लागलें आपोआप ॥ १६ ॥ सद्गुरुमुखें वेद-महावाक्यार्थ । कळूं लागला शुद्ध परमार्थ । म्हणजे समजावा तो यथार्थ । फलद्रूप झाला विरागतरु ॥ १७ ॥ वैराग्य भक्तीचें विशुद्धफल । ब्रह्मात्मज्ञान झालें पाहिजे निर्मल । जीवब्रह्मैक्य अभेदें सर्वकाल । प्रत्यक्षानुभव होऊनी ॥ १८ ॥ जयासि लाधे सद्गुरुकृपा । तयासि परमार्थ होय सोपा । सगुण निर्गुण साक्षात्काररूपा । पावतसे सच्छिष्य ॥ १९ ॥ संसारसागरीं तारक । गुरु

साक्षात्परब्रह्म एक । तें गुरुचरित्र अलौकिक । शिष्या ऐक सावधानें ॥ १२० ॥ अक्कलकोटापासूनि दीड कोसावर । नागनळीग्राम लहान सुंदर । एकेकालीं नृसिंहमुनीश्वर । त्या ग्रामांत पातले ॥ २१ ॥ यतीश्वर समागमीं त्या वेळीं । पुष्कळ जमली होती मंडळी । त्यांसहित शिवचंद्रमौली । गेले साधन दुधनीस ॥ २२ ॥ श्रीपादभट्ट आणि सरस्वती वृद्ध । होते स्वामिरायासंनिध । दर्शनेच्छु लोक करित शोध । गेले दुधनीस सर्वही ते ॥ २३ ॥ इकडे अक्कलकोटाहूनि । फलाहार सामग्री सिद्ध करूनि । चोळाप्पानें कृष्णाप्पापाशीं देऊनि । समर्थांसाठीं पाठविली ॥ २४ ॥ दुधनीच्या मोठ्या टेंकडीवर । एक राहत होता फकीर । तयाच्या जागेंत त्रैमूर्ति अवतार । सद्गुरुवर स्थित होते ॥ २५ ॥ तेव्हां कृष्णाप्पानें फलाहाराचे । पदार्थ पात्रीं मांडिले साचे । त्यांतील पांच सात ग्रास तयाचे । हस्तें भक्षिलें यतीश्वरें ॥ २६ ॥ ते दिवशीं सायंकाळपर्यंत । तेथेंचि बैसले श्रीमद्दत्तावधूत । सर्व लोक झाले क्षुधार्त । मागती भोजन गुरुनाथा ॥ २७ ॥ अहो अंतकालापेक्षां अधिक । माध्यान्हकाळ कठिण बोलती लोक । क्षुधापिशाचिनी अत्यंत बाधक । होय अन्नोदकांवाचून ॥ २८ ॥ अन्नापासूनि भूतें उद्भवतीं । अन्नानेंच प्राणी जीवंत राहती । अन्नांतचि सर्व लय पावती । ऐशी श्रुति गर्जतसे ॥ २९ ॥ अन्नभक्षणावीण कांहीं न सुचे । गोड न लागती उपभोग पदार्थांचे । अथवा धर्माधर्मादिक फुकाचे । कोणतेंही प्रिय न लागे ॥ १३० ॥ क्षुधापिशाचिनीबाधा अनिवार । हें जाणती संपूर्ण प्राणिमात्र । म्हणून भोजन याचिती क्षुधातुर । जगदीश्वराकारणें ॥ ३१ ॥ तेथूनि ब्राह्मणांचीं सदनें दूर । रजनी लोटली एकप्रहर । प्रज्ञापुराहूनि पाचारणार्थ सत्वर । आले नृसिंहराव भोसले ॥ ३२ ॥ शिबिकेसह भोई लोक । उष्ट्र स्वारयुक्त पातले अश्वादिक । त्यांनाहि लागली फार भूक । झाले व्याकुळ सर्वही ॥ ३३ ॥ मग स्वामीसमर्थ सर्वांला । चुर्मालाडू यथेष्ट भोजनाला । मिळतील सांगती तों आला । हैद्राबादचा श्रीमंत ॥ ३४ ॥ ककुभाई राजेंद्र जहागीरदार । संगें घेऊनि भृत्यादिक परिवार ।

पातला जगद्वर्यासमोर । जावळ काढावया पुत्राचें ।। ३५ ।। शिधा सामग्री पदार्थ बहुत । आणिले होऊनि पुत्रवंत । वारंवार लोटांगण घालित । स्त्रीपुत्रांसह गुरुपदा ।। ३६ ।। रजनी झालीसे दोन याम । समस्तां फलाहार देऊनि प्रथम । तृप्त केले पावले आराम । मनुष्यादिक सकलही ।। ३७ ।। दुसरे दिवशीं पुत्राचें जावळ । काढवूनि झालें स्नानमंगल । विध्युक्त पूजिले तमालनीळ । श्रीफलादिक अर्पिलें ।। ३८ ।। उत्तम पक्वान्नें चतुर्विध । लेह पेय चोष्य खाद्यादि निर्वेध । यथेच्छ भोजन नानाविध । करूनि तृप्त सर्व झाले ।। ३९ ।। तांबूल दक्षिणा आणि दान । योग्यतेनुसार सर्वांलागून । इतरही पंक्तीस जेविले जन । आशीर्वचनें ।। १४० ।। याप्रमाणें दिवस तीन । जहागीरदारानें समाराधना करून । नानाजातींच्या लोकांस मिष्टान्न । घातलें भोजन यथेच्छ ।। ४१ ।। जेथें न मिळे अन्न एक ग्रास । तेथें अनेक मानव पशुपक्ष्यादिकांस । आकंठपर्यंत तीन दिवस । उत्तमान्न भोजन मिळालें ।। ४२ ।। समर्थांचें अघटित करणें । न कळे देवादिकांकारणें । तेथें अन्नार्थी अल्पमतीस कळणें । हें तो केवळ न घडेचि ।। ४३ ।। असो स्वामीसमर्थांचा आशीर्वाद । घेऊनि श्रीफलादिकप्रसाद । राजेंद्र जहागीरदार पूर्णानंद– । युक्त गेले स्वनगरीं ।। ४४ ।। इकडे नृसिंहराव भोसले । सविनय सद्गुरूसि म्हणाले । अक्कलकोटासि चलावें पहिले । इच्छेनुरूप कृपाघना ।। ४५ ।। हें परिसूनि स्वामी-दत्तात्रेय । वदती श्रवण करा भक्तप्रिय । गौड गांवांतूनि जाऊं निर्भय । इच्छा आमुची यापरी ।। ४६ ।। लोक म्हणती गौड ग्राम कोणीकडे । विनाकारण जावें कां वांकडे । गुरुवर्य वदती वाटेल तिकडे । जाऊं आम्ही जगद्धिता ।। ४७ ।। ऐसें वदून दत्तात्रेय गिरिनारी । निघाले स्वच्छंद व्यवहारी । पाठीमागें सर्व लोक आणि सेवेकरी । धांवले वाहनादि घेऊनि ।। ४८ ।। एक वृषभ त्या गौडग्रामांत । सर्पदंश होऊनि झाला मृत । करुणार्णव सच्चिदानंदावधूत । गेले वृषभास पहावया ।। ४९ ।। त्वरेनें त्या स्थानीं ग्रामस्थ । आले दर्शनासि सकळिक । स्वामीसमर्थांनीं मारूनि हांक । उठविलें मृत वृषभासि

॥ १५० ॥ एक दिवस मृत होऊनि पडिला । तयासि तात्काळ उठविला । हें पाहूनि सर्व जनांला । अगणित आश्चर्य वाटलें ॥ ५१ ॥ नंतर पातले अक्कलकोटास । तेथून लोहारगांव वीस कोश । त्या ग्रामींच्या बापू कुळकरण्यास । कंठास छिद्र पडिलें होतें ॥ ५२ ॥ गृहस्थाश्रमी ऋग्वेदी ब्राह्मण । व्यथेमुळें सुटलें अन्न भक्षण । उदक प्राशितां कंठछिद्रांतून । वाहे बाहेर क्लेशद ॥ ५३ ॥ असंख्य केले प्रयत्न उपाय । परंतु किंचित्ही व्यथा शांत न होय । मग त्रासूनियां अतिशय । गेले गाणगापुरासि ॥ ५४ ॥ गुरुचरित्र ग्रंथाचें सप्ताह पठण । केलियावरी झाले दृष्टांत स्वप्न । पार्थिव गणपति करावे म्हणून । दत्ताशीर्वचन लाधलें ॥ ५५ ॥ आज्ञानुसार नित्य गणेशमृन्मय । पार्थिव करिती बापू द्विजवर्य । एके वेळीं वाम हस्तावरी पार्थिव गणराय । घेऊनि विध्युक्त पूजिती ॥ ५६ ॥ तंव एक महाभुजंग तयांचे अंगावरी । चढला म्हणूनि भयभीत भारी । मठांतील जन म्हणती झडकरी । सत्वर उठ रे ब्राह्मणा ॥ ५७ ॥ वाम करीं पार्थिव गणेश असे । विप्र वदे आतां उठावें कसें । तों करींचें पार्थिव पडलें अपैसें । हें देखूनि सर्प पळाला ॥ ५८ ॥ तेव्हांपासूनि कंठछिद्रव्यथा मंदगति । वाटूं लागली स्वल्प शांति । मग दत्तात्रेव बापूस आज्ञापिती । हरिगुणवर्णन कवित्व करी ॥ ५९ ॥ वेदशास्त्राभ्यास नाहीं मजला । द्विज वदे केवीं करूं मी कवनाला । तथापि आज्ञानुसार अभंगाला । केला प्रारंभ बापूंनीं ॥ १६० ॥ अभंग रचिले तीन चार शत । परंतु शेवटील चरण पूर्ण न होत । बापू कुळकरणी होऊनि चिंताग्रस्त । दत्तात्रेयासि प्रार्थिती ॥ ६१ ॥ मग स्वप्नीं दृष्टांत होई तदा । पूर्णब्रह्म-परमपुरुषाचे पदा । अक्कलकोटीं जाऊनि अनन्य वंदा । त्यावीण पाद सिद्ध नोहे ॥ ६२ ॥ आम्हीच प्रत्यक्ष अवतारिक तेथें वसतसों । याविषयीं संशय कधींच नसो । वेदविहितमार्ग सदा सर्वत्र वसो । हाचि ठसो हितोपदेश ॥ ६३ ॥ मग सत्वरें बापू कुळकरणी । अक्कलकोटीं पातला श्रीगुरुचरणीं । शरण साष्टांग लोटांगणीं । आला भक्त वैष्णव ॥ ६४ ॥ श्रीमद्दत्तात्रेयपादकमल । स्वकंठासि लाविलें कोमल ।

तेव्हां यतीश्वर सांगती प्रांजल । चतुर्थ चरणें अभंगांचीं ॥ ६५ ॥ त्याकालीं बापूसि पटला पूर्णानुभव । म्हणे विश्वात्मा आपण देवाधिदेव । अमानुषिक लीला अनंत अपूर्व । नेणों आम्ही प्रापंचिक ॥ ६६ ॥ श्रीस्वामी साक्षात् परमेश्वर । करितसां महाराजा जगदुद्धार । पूर्णब्रह्मस्वरूप व्यापक चराचर । हेतुदृष्टांतवर्जित आहां ॥ ६७ ॥ मग सद्गुरुनाथ दत्तात्रेय । बापू विप्रें पूजिले जगत्प्रिय । तदा कंठछिद्र व्यथा गेली अमय । पूर्वींहूनि उत्तम ॥ ६८ ॥ दत्तात्रेयप्रसादें कवित्व कुशल । बापू कुळकरणी लोकविश्रुत निर्मल । दासबापू या नामें प्रसिद्ध सर्वकाल । संतपदवीस पावले ॥ ६९ ॥ झाला भगवत्प्रसाद जयावरी । तयासि लाधती पुरुषार्थ चारी । श्रीगुरुलीलामृताब्धिलहरी । सर्व करी कार्य सिद्ध ॥ १७० ॥ येथें निःसंशय पाहिजे सद्भाव । भाव तेथेंचि उभा देव । लीलामृताचा स्वादानुभव । घ्यावा जनहो अवश्य ॥ ७१ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । षोडशाध्याय रसाल हा ॥ १७२ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे षोडशोऽध्यायः समाप्तः ॥ १६ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥